दैनिक महाराष्ट्र **www.esuryodaylive.com** **Email :** suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती)




कोकण ‖ वर्ष ६ वे ‖ अंक ८३ ‖ शनिवार २१ मार्च २०२६ ‖ RNI No.MAHMAR/2014/54581 ‖ Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 ‖ पाने ४ किंमत २ रुपये ‖

# गोरेगावात छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाचा नूतनीकरण लोकार्पण सोहळा नामदार भरतशेठ गोगावले यांच्या उपस्थितीत उत्साहात साजरा

विशेष प्रतिनिधी : नंदकुमार चांदोरकर दि. १९ मार्च २०२६ रोजी मराठी नववर्षाचे औचित्य साधत ङ्गमाणगाव तालुक्यातील गोरेगांवमधील संत रोहिदास गर्जना मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचा नूतनीकरण लोकार्पण सोहळा मोठ्या उत्साहात नामदार भरतशेठ गोगावले यांची प्रमुख उपस्थिती पार पडला. ङ्गया सोहळ्या वेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. ङ्गछत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक १९९५ साली मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्व. प्रवीण रमेश गोरेगांवकर यांच्या कारकिर्दीत उभे करण्यात आले होते. या स्मारकास ३० वर्षे उलटल्याने संत रोहिदास गर्जना परिवाराने सदर स्मारकाचे नुतनीकरण करण्याचा विचार केला गेला आणि त्या विचारांवर शिक्कामोर्तब करण्यात आला आणि या जुन्या स्मारकाचे नुतनीकरण करित अखेर काल दि. १९ मार्च २०२६ रोजी मराठी नुतनवर्षाच्या मुहुर्तावर मोठया जल्लोषात छत्रपती शिवरायांच्या स्मारकाचा लोकार्पण सोहळा पार पाडण्यात आला. ङ्गया सोहळ्याची सुरुवात सर्व प्रथम मा. ना. भरतशेठ गोगावले यांच्या हस्ते स्मारकाचे लोकार्पण करण्यात आले त्यानंतर मान्यवरांनी दिप प्रज्वलन केले राकेश गोरेगांवकर यांनी प्रस्तावना सादर करित मा. ना. भरतशेठ गोगावले यांच्या सह उपस्थित सर्व मान्यनरांना शाल श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. ङ्गकार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रसाद गोरेगावकर यांनी भूषविले. त्यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात पार पडला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचा गौरव करत समाजात ऐक्य, प्रेरणा आणि देशभक्तीची भावना जपण्याचे आवाहन केले.ङ्गसंत रोहिदास गर्जना मंडळाच्या परिवाराच्या वतीने अध्यक्ष प्रसाद गोरेगावकर यांच्यासह आदित्य गोरेगांवकर, ओमकार गोरेगावकर, राकेश गोरेगावकर, गिरीश गोरेगांवकर, नरेंद्र गोरेगांवकर, रोशन गोरेगांवकर, किरण गोरेगांवकर, ओम गोरेगांवकर, परेश पाबरेकर, विजय आंबेतकर, श्रवण गोरेगांवकर सह मंडळातील सर्वच सदस्यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. तसेच मार्गदर्शक म्हणून मंगेश गोरेगावकर, सत्यवान गोरेगावकर, दिलीप गोरेगावकर आणि राजेंद्र गोरेगावकर, महादेव आंबेतकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.ङ्गस्मारकाच्या नूतनीकरणामुळे परिसरात नवचैतन्य निर्माण झाले असून नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले आहे. कार्यक्रमाचा शेवट सर्व उपस्थितांच्या आभार प्रदर्शनाने करण्यात आला.ङ्गया कार्यक्रमास सरपंच जुबेर अब्बासी, उपसरपंच चंद्रकांत गोरेगांवकर, नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्य दिनेशजी हरवंडकर, पंचायत समित सदस्य स्वाती ताई करकरे, रविदादा टेंबे, ज्ञानदेव पद्रत, तसेच बापुसाहेब सोनगिरे, विकास दादा गायकवाड व इतर मान्यवर उपस्थित होते.



# मोतीबिंदूमुक्त महाराष्ट्रासाठी सर्वांचे योगदान आवश्यक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आवाहन

मुंबई : मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र करण्यासाठी समाजातील सर्व घटकांचे योगदान आवश्यक आहे. प्रत्येकाने आपली जबाबदारी पार पाडल्यास मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र साध्य करणे सहज शक्य होईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले.ङ्गङ्ग नेत्रआरोग्य क्षेत्रात मोलाचे कार्य करत समाजसेवेचा आदर्श निर्माण करणारे आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल, पनवेल तसेच शंकरा आय फाउंडेशन इंडिया या संस्था रुग्णसेवेसाठी सातत्याने कार्यरत आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञान, अनुभवी डॉक्टरांचा कार्यसंघ आणि समाजाभिमुख उपक्रमांच्या माध्यमातून या संस्थांनी हजारो रुग्णांना दृष्टीदान करून त्यांच्या आयुष्यात प्रकाश आणला आहे. मोतीबिंदू मुक्त महाराष्ट्र या मोहिमेत ही महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.ङ्गङ्गमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, शंकरा आय हॉस्पिटल व शंकरा आय फाउंडेशन इंडिया यांचे कार्य हे सार्वजनिक – खाजगी भागीदारी, सामाजिक संवेदनशीलता आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा यांचे आदर्श उदाहरण आहे. शंकरा आय फाउंडेशन इंडिया ही संस्था देशभरात नेत्रसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने विविध रुग्णालयांमध्ये आरोग्य सेवांची उपक्रमे राबवत आहे. त्याचाच एक भाग म्हणून पनवेल येथील आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल हे अत्याधुनिक सुविधा, उच्च दर्जाची उपचारपद्धती आणि रुग्णकेंद्रित सेवा यासाठी ओळखले जाते. या रुग्णालयामध्ये मोतीबिंदू, रेटिना, ग्लॉकोमा, कॉर्निया, बाल नेत्ररोग तसेच इतर नेत्रविकारांवर अत्याधुनिक उपचार उपलब्ध आहेत. आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठीही सवलतीच्या दरात किंवा मोफत उपचाराची सुविधा देण्यात येते. ग्रामीण आणि दुर्गम भागात नेत्रतपासणी शिबीरे आयोजित करून गरजू रुग्णांना उपचारासाठी रुग्णालयात आणण्याचे कार्यही संस्था सातत्याने करत आहे. अशा उपक्रमांमुळे ‘ मोतिबिंदू मुक्त महाराष्ट्र’ या संकल्पनेला बळ मिळत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.ङ्गङ्गमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पुढे म्हणाले की, जून २०२१ ते नोव्हेंबर २०१५ या कालावधीत हॉस्पिटलच्या माध्यमातून कोंकण, मुंबई , मराठवाडा, खानदेश या भागात १,४२८ मोफत नेत्रतपासणी शिबीरे आयोजित करण्यात आली व २,३८,६०४ रुग्णांची तपासणी आणि ४३,४३५ शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या करण्यात आल्या आहेत. यापैकी सुमारे ८० टक्के रुग्णांना मोफत उपचार व शस्त्रक्रिया देण्यात आल्या, ही बाब सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरणारी आहे.ङ्गङ्गयाशिवाय, महात्मा जोतिराव फुले जनआरोग्य योजना (एमजेपीजेएवाया) अंतर्गत ७५३गंभीर नेत्ररोगग्रस्त रुग्णांना (रेटिना, कॉर्निया, बाल स्क्विंट व बाल मोतीबिंदू) लाभ देण्यात आला.ङ्गङ्गतसेच, शालेय मुलांच्या नेत्रआरोग्यासाठी राबविण्यात येणाऱ्या ‘रेनबो आय हेल्थ प्रोजेक्ट’ अंतर्गत रायगड, नवी मुंबई व एमएमआरडीए परिसरातील २२८ शाळांमधील १,३८,६०३ विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी करण्यात आली. यामध्ये ३,६५० चष्म्यांचे मोफत वितरण आणि २९ बाल नेत्रशस्त्रक्रिया पूर्णतः मोफत करण्यात आल्या.ङ्गङ्गया उल्लेखनीय कार्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आर. झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलच्या अध्यक्षा रेखा झुनझुनवाला,ङ्गआणि शंकरा आय फाउंडेशन इंडियाचे संस्थापक व विश्वस्त डॉ. आर. व्ही. रमणी यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

## जागतिक जल दिनानिमित्त निवेदिता प्रतिष्ठान तर्फे जलपूजनाचे आयोजन डोळे उघडायला लावणारे पाण्याची सद्यस्थिती दर्शविणारे डिजिटल प्रदर्शन ठरणार आकर्षण

दापोली – जागतिक जल दिन दरवर्षी २२ मार्च रोजी गोडया पाण्याच्या महत्त्वाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि जलसंपत्तीच्या शाश्वत व्यवस्थापनासाठी साजरा केला जातो .ङ्ग या दिनाचे औचित्य साधून निवेदिता प्रतिष्ठान जालगाव तालुका दापोली या संस्थेच्या माध्यमातून २२मार्च २०२६ रविवार रोजी सायंकाळी पाच ते सात या वेळेत जालगाव येथील भारतरत्न पां.वा.काणे स्मारक या ठिकाणी जलपूजनाचे आयोजन करण्यात आले आहे. या निमित्त शुद्ध पाण्याचा कलश श्री क्षेत्र केशवराज येथून आणण्यात येणार असून या शुद्ध निर्मळ पाण्याचे पूजन करण्यात येणार आहे. वाढते जलसंकट, प्रदूषण आणि पाणी बचतीचा संदेश देण्यासाठी या निमित्ताने सद्यस्थितीत पाण्याची स्थिती दर्शवणारे डिजिटल प्रदर्शन आणि परंपरांची ओळख करून देणारे पुराण वस्तू प्रदर्शन सर्व नागरिकांना पाहण्यास मिळणार आहे. जलपूजनाच्या या कार्यक्रमाचा लाभ तमाम नागरिकांनी घ्यावा आणि पाण्याबाबतची सद्यस्थिती जाणून घ्यावी असे आवाहन निवेदिता प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.प्रशांत परांजपे आणि संयोजन समितीने केले आहे.



# कळबोंली मधे गुडीपाडवा हिंदु नववर्षाचे जल्लोषात स्वागत

पनवेल प्रतिनिधी सुनील जाधव

नवी मुंबई,चैत्र शुध्द प्रतिपदा म्हणजेच गुडीपाडवा सुष्टीतील नवचैतन्य जागवणारा आणि सुखसम्रुध्दीची गुढी उभारणारा असा हा सण भारतीय संस्क्रुतीमधे अत्यंत पवित्र मानला जाणारा गुढीपाडवा या दिवशी मराठी नववर्षाच्या स्वागतासाठी कळबोंली येथे भव्य शोभा यात्रा मोठ्या उत्साहा मधे पार पाडली.सकाळी आठ वाजता श्री गुढीचे पुजन करुन शोभा यात्रेला सुरुवात करण्यांत आली.महाराष्ट्र शाळेतील प्रांरपारीक पेहरावात मुलींचे लेझीम पथक विशेष आकर्षण ठरले.शोभा यात्रेमधे ढोलतांश्याच्या कडकडाटाने वातावरण निनादुन गेले होते.महीलांनी पारंपारीक नउवारी साडी तर पुरुषांनी फेटा पारिधान करुन या मधे सहभाग घेतला.या उत्साही कार्यक्रमामुळे संपुर्ण परिसर चैतन्यमय झाला होता.तरुण आणि महीलांनी जल्लोषात गुढीपाडवा साजरा केला.या यात्रेचे कळबोंली येथील नागरिकांनी जल्लोषात स्वागत केले.



## संपादकीय

# जिल्ह्याजिल्ह्यांत नशामुक्तीचा संकल्प

भारत विकसित राष्ट्र बनविण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना समाज नशामुक्त असणे अत्यावश्यक आहे. तरुण पिढीला व्यसनापासून दूर ठेवण्यासाठी आणि निरोगी समाज घडविण्यासाठी नशामुक्ती अभियान महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जनजागृती, समुपदेशन आणि सामूहिक प्रयत्नांमधूनच व्यसनमुक्त भारताचे स्वप्न साकार होऊ शकते.

नशामुक्ती अभियान आपल्या भारत देशाच्या शतक महोत्सवी स्वातंत्र्याच्या वर्षापर्यंत विकसित भारत होण्यासाठी भारत सरकार प्रयत्नशील आहे. यासाठी देशातील सामाजिक परिस्थिती, पर्यावरणीय शाश्वतता, आर्थिक वाढ आणि सुशासन अशा विविध बाबींचा समावेश आहे. म्हणजे आपला देश एक विकसित राष्ट्र म्हणून ओळखला जाणार आहे; परंतु असे असले तरी त्या देशातील नागरिक नशामुक्त असले पाहिजेत तरच देश खऱ्या अर्थाने विकसित बनू शकतो. देशाच्या विकासासाठी नशामुक्ती होणे गरजेचे आहे. त्यासाठी देशात नशामुक्ती अभियानाच्या माध्यमातून प्रामाणिकपणे जनजागृती झाली पाहिजे. भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाने १५ ऑगस्ट २०२० रोजी देशात नशामुक्ती भारत अभियान सुरू केले. प्रथम देशातील २७२ जिल्ह्यांत हे अभियान राबविण्याचे निश्चित करण्यात आले होते. सध्या ३७२ जिल्ह्यांमध्ये नशामुक्ती अभियान राबविले जात आहे. आपल्या देशात सन २०२१ मध्ये ७५२ जिल्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. उत्तर प्रदेश राज्यात सर्वात ७५ जिल्हे असून सर्वात कमी गोवा राज्यात २ जिल्हे आहेत, तर आपल्या महाराष्ट्र राज्यात ३६ जिल्हे आहेत. तेव्हा देशाच्या विकासाच्या दृष्टिकोनातून प्रत्येक जिल्ह्यात नशामुक्ती अभियान राबविणे गरजेचे आहे.

नशामुक्ती अभियानाचा मुख्य उद्देश मादक द्रव्यांपासून मुक्त करणे, तरुणाईला जागृत करणे आणि नशा व्यक्तींचे पुनर्वसन करणे ही आहेत. म्हणजे नशामुक्ती अभियान निरोगी जीवन आणि आनंददायी समाज घडविण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यासाठी देशातील तरुणाईमध्ये नशामुक्ती विषयी जनजागृती अतिशय महत्त्वाची आहे. काही ठिकाणी नशा करून गळफास घेतल्याची उदाहरणे आहेत. तसेच अपघात झालेले आहेत तरी सुद्धा आकस्मिक मृत्यूची नोंद केली जाते. बस डेपोच्या परिसरात, रेल्वे पटरी, पडीत इमारतीमध्ये, वस्ती नसलेल्या रस्त्याच्या बाजूच्या झुडपात, फुटपाथ, रेल्वे प्लेटफॉर्मवर इत्यादी ठिकाणी नशा करणारी मुले व वृद्ध व्यक्ती पाहायला मिळतात. यासाठी देशातील प्रत्येक जिल्ह्यात नशामुक्तीसाठी जनजागृती झाली पाहिजे. त्यासाठी मादक द्रव्यांच्या सेवनामुळे होणारे वाईट परिणाम सुजाण नागरिकांना सांगावे लागतील. यामध्ये सामाजिक संस्था, शिक्षण संस्था, विविध स्वयंसेवी संस्था अशा संस्थांमार्फत जनजागृतीची मोहीम हाती घ्यावी. तसेच त्या आनुषंगाने विविध कार्यक्रम राबविण्यात यावेत. व्यसनाधीन झालेल्या नागरिकांचे सुद्धा योग्यप्रकारे समुपदेशन करून त्यांचे पुनर्वसन करण्यात यावेत. यातून निरोगी समाज कसा निर्माण करता येईल त्या दृष्टिकोनातून मादक द्रव्यांचे प्रमाण कमी कसे करता येईल, त्याप्रमाणे प्रयत्न करावा. यातून देशात निरोगी समाज निर्माण करता येईल. याचा चांगला परिणाम लोकांचे सरासरी आयुर्मान वाढण्याला मदत होणार आहे. याला कारण वैद्यकीय सेवा आणि पोषण आहार म्हणता येईल. याच्या जोडीला नशामुक्ती महत्त्वाची आहे. सध्या देशात मादक द्रव्यांचा विचार केल्यास यात तरुण पिढी जास्त आहारी गेलेली दिसत आहे. यामुळे विकसित भारत राष्ट्र कसे होणार? केवळ जनजागृती करून चालणार नाही, तर शासन पातळीवर कायदेशीर कारवाई होणे आवश्यक आहे. एकीकडे मादक द्रव्यांचे सेवन करण्यास प्रतिबंध करणे आणि दुसरीकडे शासन मान्य देशी दारूचे दुकान म्हणून मान्यता देणे. त्याला सुजाण नागरिकांनी विरोध केल्यास शासनाचा महसूल बुडतो अशी आरडाओरड सुरू केली जाते. मात्र यावरती कायदेशीरपणे प्रतिबंध होणे गरजेचे आहे. यासाठी सामूहिक जागृती, पथनाट्य व पोस्टर्स लावून जनजागृती केली जात आहे. काही ठिकाणी तरुण पिढी बरबाद होऊ नये म्हणून दुकाने बंद करण्याचा प्रयत्न सुद्धा झाला. दारूची दुकाने काही दिवस बंद करण्यात आली. मात्र काही दिवसांनी पुन्हा दारूची दुकाने सुरू करण्यात आली. मादक द्रव्यांच्या सेवनाने गंभीर आजार, मानसिकदृष्ट्या खचून जाणे, कर्जबाजारी, शारीरिक समस्या अशा अनेक समस्या निर्माण होत आहेत. ग्रामीण भागात अनेकांचे संसार उद्ध्वस्त होत चालले आहेत.

# चवदार तळे सत्याग्रहातून समतेची मुहूर्तमेढ शताब्दी वर्षात समतामूलक भारताचा संकल्प : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

रायगड, दि.२०(जिमाका):- महाड येथील ऐतिहासिक चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाच्या प्रारंभानिमित्त आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी समतेचा, सामाजिक न्यायाचा आणि संविधानिक मूल्यांचा पुनरुच्चार करत भेदभावमुक्त समाज घडविण्याचा निर्धार व्यक्त केला. ङ्ग बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली झालेला हा सत्याग्रह केवळ पाण्यासाठी नव्हता, तर मानवतेच्या प्रतिष्ठेसाठीचा लढा होता, असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत महाड (रायगड) येथे चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षा निमित्त भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या शताब्दी वर्षा सुरुवात आज देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते करण्यात आली. यावेळी चवदार तळयाचे जलशुद्धीकरण आणि परिसराचे सुशोभीकरणासाठी ५५ कोटी ८० लाख निधी मंजूर करण्यात आला असून या कामांचे भूमी पूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आज करण्यात आले, त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.ङ्ग यावेळी केंद्रीय राज्यमंत्री, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार रामदास आठवले, महिला व बालविकास मंत्री कु.आदिती तटकरे, उद्योग व मराठी भाषा मंत्री डॉ.उदय सामंत, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, रोजगार हमी योजना फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले, महाराष्ट्र विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, खासदार सुनील तटकरे, खासदार धैर्यशील पाटिल, आमदार प्रवीण दरेकर, महाड नगराध्यक्ष सुनिल कविस्कर, डॉ. हर्षदीप कांबळे (भा.प्र.से.), प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, दीपा मुधोळ-मुंडे (भा.प्र.से.) आयुक्त, समाज कल्याण, रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे (भा.प्र.से.), रायगड जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले (भा.प्र.से.), पोलीस अधीक्षक आंचल दलाल (भा.पो.से.), विविध विभागांचे अधिकारी, विविध सामाजिक संघटना आणि राज्यभरातून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. ङ्ग यावेळी चवदार तळ्याच्या ठिकाणी असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृत पुतळ्यावर हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी करून मानवंदना देण्यात आली.



छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करत आपल्या भाषणाची सुरुवात करीत ङ्गमुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, १९२३ मध्ये सार्वजनिक पाणवठे सर्वांसाठी खुले करण्याचा कायदा झाला असला तरी समाजातील काही घटकांनी त्याची अंमलबजावणी रोखली. या अन्यायाविरोधात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी उभारलेला चवदार तळे सत्याग्रह हा सामाजिक समतेचा क्रांतिकारी टप्पा ठरला. “हा संघर्ष केवळ पाणी पिण्यासाठी नव्हता, तर विषमता आणि अस्पृश्यतेच्या व्यवस्थेविरुद्ध उभारलेला मानवतेचा लढा होता,” असे त्यांनी अधोरेखित केले.ङ्ग या सत्याग्रहामुळे देशातील सर्व सार्वजनिक पाणवठे सर्वांसाठी खुले झाले आणि समतेची पायाभरणी झाली, असे सांगत त्यांनी पुढील पिढीपर्यंत हा संघर्षाचा इतिहास पोहोचविण्याची गरज व्यक्त केली.ङ्गमुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी चवदार तळयाच्या सुशोभीकरणाच्या कामाचा उल्लेख करत, हे ठिकाण स्वच्छ, पवित्र आणि प्रेरणादायी स्वरूपात विकसित केले जाईल, असे सांगितले. तसेच राज्य सरकारतर्फे सामाजिक न्यायाच्या दृष्टीने विविध उपक्रम राबविण्यात येत असल्याचे त्यांनी नमूद केले. अनुसूचित जातींवरील अत्याचारातील पीडित कुटुंबातील ९८ जणांना शासकीय नोकऱ्या देण्याचा निर्णय, पीपल्स एज्युकेशन सोसायटीला दिलेला निधी, चैत्यभूमीवरील स्मारकाचे काम, तसेच लंडन व जपानमध्ये बाबासाहेबांच्या स्मृती जपण्यासाठी केलेल्या उपक्रमांचा त्यांनी आढावा घेतला.

याशिवाय, बौद्धगया येथे महाराष्ट्र भवन उभारण्याचा निर्णयही त्यांनी जाहीर केला. बाबासाहेबांच्या नावाने लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये अध्यासन स्थापन करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.ङ्ग“भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान हक्क दिले आहेत. या संविधानामुळेच भारत प्रगतीच्या मार्गावर आहे. त्यामुळे विषमता आणि अस्पृश्यता संपवून समतामूलक समाज निर्माण करण्याचा संकल्प आपण सर्वांनी करावा,” असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.ङ्ग केंद्रीय राज्यमंत्री, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार रामदास आठवले यांनी आपल्या अनोख्या काव्य शैलीत भाषणाची सुरुवात केली. महाड येथील चवदार तळे सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाच्या पार्श्वभूमीवर श्री.आठवले यांनी भव्य ‘भीमसृष्टी’ स्मारक उभारण्याची मागणी केली. ङ्ग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत ५५ कोटी रुपयांच्या विकासकामांचे भूमीपूजन करण्यात आले असून, या ऐतिहासिक स्थळाचा जागतिक दर्जावर विकास करण्यावर भर देण्यात आला. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या समानता व सामाजिक न्यायाच्या विचारांचा पुनरुच्चार करत समाजातील एकजूट अधिक मजबूत करण्याचे आवाहन त्यांनी केले. तसेच संविधान अत्यंत मजबूत असून ते बदलण्याच्या अफवा निराधार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. देश आणि राज्याला प्रगतीच्या शिखरावर नेण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महाड येथील चवदार तळ्याच्या विकासासाठी ५५ कोटी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याचे सांगत आमदार भरत गोगावले यांनी हा प्रकल्प शताब्दी वर्षापूर्वी पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला. देशभरातून येणाऱ्या अनुयायांसाठी येथे आधुनिक सुविधा निर्माण करण्यावर भर देत, रायगड येथे ‘शिवसृष्टी’ आणि महाड येथे ‘भीमसृष्टी’ उभारण्याची मागणी त्यांनी केली. या ऐतिहासिक स्थळांचा सर्वांगीण विकास करून सामाजिक आणि सांस्कृतिक वारसा अधिक भक्कम करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.ङ्ग सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी प्रास्ताविक भाषणात महाड येथील ऐतिहासिक चवदार तळ्याच्या विकासासाठी सुमारे ५६ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून या ठिकाणाचा सर्वांगीण विकास करण्याचा संकल्प व्यक्त केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या चळवळीची सुरुवात याच ठिकाणाहून झाल्याने या स्थळाला जागतिक स्तरावर नेण्याचा सरकारचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच शिक्षण, वसतिगृह आणि सामाजिक योजनांद्वारे बहुजन समाजाच्या सक्षमीकरणावर विशेष भर दिला जाणार असल्याचे त्यांनी नमूद केले.ङ्गमहाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा देशातील पहिला उपक्रमङ्ग अनुसूचित जाती अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंध कायद्यांतर्गत मृत्यू झालेल्या व्यक्तीच्या कुटुंबातील वारसांपैकी छाया अश्विन कांबळे यांना क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, मुलींचे शासकीय वसतिगृह, गौरीपाडा, कल्याण,ङ्गपूनम दिनेश जाधव यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह, शहापूर, सारिका बलभीम बनसोडे यांना सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, अनुष्का सुरेंद्रकुमार यांना मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह, गोधळपाडा, अलिबाग, पुजा नितीन मस्के यांना संत जनाबाई मुलीचे शासकीय वसतिगृह, पुणे धिरज प्रकाश पवार यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह, पैठण जि. छत्रपती संभाजीनगर, अशा एकूण ९८ वारसांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते शासकीय सेवेत नियुक्ती आदेश वितरण करण्यात आले.

# घरडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत आंतरराष्ट्रीय एसटीटीपी यशस्वीरित्या संपन्न

लवेल (रत्नागिरी) : घरडा इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, लवेल येथील केमिकल इंजिनिअरिंग विभागाच्या वतीने आयोजित “केमिकल प्रोसेस सेफ्टी अँड रिस्क मॅनेजमेंट : ट्रेंड्स अँड इंडस्ट्रियल प्रॅक्टिसेस” (०९ ते १४ मार्च २०२६) हा इंडियन सोसायटी फॉर टेक्निकल एज्युकेशन () मान्यताप्राप्त एक आठवड्याचा ऑनलाइन अल्पकालीन प्रशिक्षण कार्यक्रम (एसटीटीपी) यशस्वीरीत्या संपन्न झाला.ङ्गया कार्यक्रमाला भारतासह ओमान, स्कॉटलंड, संयुक्त अरब अमिराती, आणि सौदी अरेबिया येथील विद्यार्थी, प्राध्यापक आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. त्यामुळे हा उपक्रम आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रभावी ज्ञानविनिमयाचे व्यासपीठ ठरला.ङ्गकार्यक्रमादरम्यान प्रोसेस सेफ्टी, धोक्यांची ओळख (हॅझर्ड आयडेंटिफिकेशन), जोखीम विश्लेषण (रिस्क ॲनालिसिस), औद्योगिक सुरक्षितता पद्धती आणि आधुनिक सुरक्षितता व्यवस्थापन तंत्र या विषयांवर नामांकित तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. सहभागीना उद्योगातील आधुनिक प्रवाह, सुरक्षितता पद्धती आणि तांत्रिक आव्हानांविषयी सखोल माहिती मिळाली.ङ्गया एसटीटीपीच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. प्रमोद पाटील, उपप्राचार्य डॉ. एस. के. पाटील आणि विभागप्रमुख डॉ. एस. जे. कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाच्या समन्वयासाठी डॉ. एस. डी. आयरे, डॉ. एस. डी. डोके तसेच आयोजन समितीतील डॉ. एस. पी. टेकाडे, डॉ. एन. वाय. घारे, प्रा. एस. पी. जाधव, प्रा. जे. व्ही. मापारा प्रा. व्ही. बी. सावंत आणि प्रा. वाय. व्ही. ठाकरे यांनी विशेष परिश्रम घेतले.ङ्गया कार्यक्रमात डॉ. ए. बी. मराठे (तांत्रिक संचालक, जीआयटी) यांनी प्रमुख वक्ते (की-नोट स्पीकर) आणि मान्यवर अतिथी म्हणून मार्गदर्शन केले. त्यांच्या व्याख्यानातून सहभागींना औद्योगिक सुरक्षिततेविषयी सखोल आणि व्यावहारिक दृष्टीकोन मिळाला.ङ्गया कार्यक्रमामुळे केमिकल प्रोसेस सेफ्टी क्षेत्रात नवीन संधी निर्माण होऊन उद्योग-अकादमिक सहकार्याला चालना मिळेल, तसेच विद्यार्थ्यांच्या कौशल्यविकासाला आणि संशोधनाभिमुख दृष्टीकोनाला बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील तांत्रिक शिक्षणाला जागतिक स्तरावर नवी दिशा मिळाल्याचेही मानले जात आहे.ङ्गयाशिवाय विविध देशांतील तज्ज्ञांमधील संवादातून नवीन संशोधन संधी आणि औद्योगिक सहकार्याच्या शक्यता अधोरेखित झाल्या. भविष्यात अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावरील स्पर्धेसाठी तयार होण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी सहभागींचे आभार मानून प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले.

# मिशन लक्षवेध विभागीय स्पोर्ट्स एक्सलन्स सेंटर प्रवेशासाठी २४ मार्चपर्यंत मुदतवाढ

रत्नागिरी, दि, २० ( जिमाका) :- क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य व विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा कोल्हापूर विभाग यांचेव्दारा प्रथम टप्यात मिशन लक्षवेध अंतर्गत कोल्हापूर येथे शूटींग आणि कुस्ती व सांगली येथे रोईंग

अशा खेळांचे विभागीय स्तरावर स्पोर्टस एक्सलन्स सेंटर सुरु करण्यात येणार आहेत. प्रवेशासाठी अर्ज २४ मार्च २०२६ पर्यंत विभागीय उपसंचालक क्रीडा व युवक सेवा, छत्रपती संभाजी महाराज स्टेडियम, रेसकोर्स नाका संभाजी नगर, कोल्हापूर येथे प्रत्यक्ष अथवा dydkop@gmail.com . या ई-मेलवर सादर करावेत असे आवाहन कोल्हापूर विभागाचे विभागीय उपसंचालक सुहास पाटील यांनी केले आहे.ङ्गप्रत्येक खेळासाठी २० खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. यासाठी राज्य स्तरावर प्राविण्य प्राप्त व राष्ट्रीय स्तरावरील सहभागी खेळाडू तसेच ३१ डिसेंबर २०२६ रोजी वय २५ वर्षे आतील असणे आवश्यक आहे अशी किमान अर्हता

असून मागील दोन वर्षातील कामगिरीचे मूल्यमापन करण्यात येईल. क्रीडा कौशल्य व शारीरिक क्षमता चाचण्या घेवून प्रशिक्षणार्थींची निवड अंतिम करण्यात येणार आहे. विभागीय स्तरावर स्पोर्टस एक्सलन्स सेंटर मध्ये निवड होणाऱ्या खेळाडूंना निवास, भोजन, गणवेश व प्रशिक्षण, तज्ञ मार्गदर्शक इत्यादी सुविधा पुरविण्यात येणार आहेत. यावरील खर्च शासनाद्वारे करण्यात येणार आहे.

# मिशन लक्षवेध विभागीय स्तरावरील क्रीडा निपुणता केंद्राकरिता खेळाडू निवड चाचणी

रत्नागिरी, दि, २० ( जिमाका) :- राज्यातील क्रीडा विकासाकरिता मिशन लक्ष्यवेध हा महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आलेला आहे. क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडाविषयक पायाभूत सुविधा, स्पर्धांचे आयोजन, क्रीडा वैद्यकशास्त्र, खेळाडूंना प्रोत्साहन व पुरस्कार, खेळाडूंना करीअर मार्गदर्शन, खेळाडूंच्या क्षमता विकासासाठी देशी-विदेशी संस्थांचा सहयोग हे सर्व घटक विकसीत होण्याच्या दृष्टीने मिशन लक्ष्यवेध ही योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे.

पुणे विभागाचे विभागीय क्रीडा निपुणता केंद्र हे निवासी केंद्र असून या केंद्राकरिता सद्यस्थितीत अॅथलेटिक्स, शुटींग, रोईंग, कुस्ती, टेबल टेनिस, हॉकी या सहा खेळांकरिता खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. पुणे विभागाचे विभागस्तर खेळनिहाय चाचण्यांचे आयोजन २३ व २४ मार्च या कालावधीत शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी, पुणे येथे आयोजित करण्यात आले आहे.

२३ मार्च रोजी सकाळी ११ वाजता वेटलिफ्टिंग हॉल शिवछत्रपती क्रीडा संकुल म्हाळुंगे बालेवाडी, पुणे येथे अॅथलेटिक्स, शुटींग, कुस्ती, टेबल टेनिस,

हॉकी या खेळांकरीता तर रोईंग या खेळाकरीता आर्मी रोईंग नोड, सी. एम. ई. पुणे या ठिकाणी खेळाडूंनी उपस्थित राहायचे आहे. खेळाडूंनी जन्मदाखला, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, गत २ वर्षातील क्रीडा विषयक कामगिरीचे प्रमाणपत्र, शाळा/महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, क्रीडा कामगिरी (शुटींग, टेबल टेनिस, अॅथलेटिक्स, कुस्ती, हॉकी या खेळाचे राज्य/राष्ट्रीय स्तरावरील रँकींग) मूळ कागदपत्रे सोबत आणावयाची आहेत. खेळाडूंनी निवास व भोजन व्यवस्था स्वतः करायची आहे. ङ्गविभागस्तर क्रीडा निपुणता केंद्राच्या प्रवेशाकरिता चाचण्यांचा कार्यक्रम निश्चित केला असून दिनांक २३ मार्च रोजी वर नमूद ठिकाणी आवश्यक साहित्यासह उपस्थित रहावे. अधिकृत राष्ट्रीय स्पर्धेतील सहभाग अथवा राज्यस्तरीय स्पर्धेतील प्राविण्य प्राप्त इच्छुक खेळाडूंना निवड चाचणीकरिता वर नमूद केलेल्या ठिकाणी उपस्थित राहणेबाबत सूचित करण्यात येत आहे. अधिक माहितीसाठी वैशाली दरवडे, मो. क्र. ९८९०२२५११७, संकेत मचाले, मो.क्र. ७०३८२२५०१४ व आकाश सलगर, मो. क्र. ९२८४८०६००३ यांच्याशी संपर्क साधावा. जिल्ह्यातील जास्तीत जास्त वरील संबंधित खेळातील अधिकृत राष्ट्रीय स्पर्धेतील सहभाग अथवा राज्यस्तरीय स्पर्धेतील प्राविण्य प्राप्त इच्छुक खेळाडूंनी सदर निवड चाचणीला उपस्थित राहावे असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी विजय शिंदे यांनी केले आहे.

## इराणला साथ न देणे ही भारताची मोठी चूक; राज ठाकरेंचे टीकास्त्र

मुंबई : जगभरात सध्या भीषण परिस्थिती आहे. सध्या सगळीकडे धाकधूक आहे. लोकांना अन्न शिजवायला गॅस मिळत नाही. खरे तर काही गोष्टी आपल्याकडून राहून गेल्या. आपले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडून राहून गेल्या. इराण इतकी वर्षे आपल्याला साथ देत होता. त्या इराणवरती जे हल्ले होत आहेत, त्यामध्ये आपण इराणला साथ द्यायला हवी होती. भविष्यात या सर्व गोष्टींचा फटका भारताला बसणार आहे, अशा शब्दांत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी केंद्र सरकारवर टीका केली.



गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर शिवतीर्थावर मनसे प्रमुख राज ठाकरे यांची तोफ धडाडली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या स्थापनेला २० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने राज ठाकरे यांनी आपल्या खास शैलीत राज्यातील विकासाचा बोजवारा, नोकऱ्यांचा प्रश्न आणि वाहतूक कोंडीवरून सरकारला धारेवर धरले.

आंतरराष्ट्रीय घडामोडींवर राज ठाकरे म्हणाले की, ''देशामध्ये येणारे बरेचसे तेल इराणहून येते. ते आपल्याला तेल रुपयात देतात. खामेनी गेल्यानंतरही आपल्या पंतप्रधानांनी कुठलेही निषेधाचे एकही निवेदन काढले नाही. हल्ल्यावरही कुठले निवेदन दिले नाही, इराणला पाठिंबा न देणे ही मोठी चूक असून, त्याचे गंभीर परिणाम भविष्यात देशाला भोगावे लागतील.''

राज्यात भीषण परिस्थिती

''राज्यात शेतकरी दररोज आत्महत्या करत आहे, परिस्थिती गंभीर आहे. परंतु, आपण हे सर्व फक्त पाहतोय आणि केवळ मोबाईलवर व्यक्त होतोय. आपण आभासी जगतात अडकलो आहोत. मैदानात उतरून संघर्ष करण्याऐवजी तरुण पिढी केवळ सोशल मीडियापुरती मर्यादित राहिली आहे. कोस्टल रोड बांधला गेलाय खरा, पण तो तुमच्या सोयीसाठी झालेला रस्ता नाही. तो इतरांना मुंबईत सहज येण्यासाठी आणि तुम्हाला मुंबईच्या बाहेर काढण्यासाठीचा मार्ग आहे. आपले संपूर्ण राज्य कर्जाच्या विळख्यात अडकले आहे. तुम्ही राज्यातील कोणत्याही शहरात जा, तिथे ना कसला आकार उरला आहे ना उकार आहे. शहरांची दुरवस्था झाली आहे,'' अशी टीकाही त्यांनी केली.

## अल्पसंख्याक शिक्षण संस्थामध्ये सरकारचा हस्तक्षेप अवैध

नागपूर : कायदेशीर अधिकार नसतानाही राज्यातील शिक्षणाधिका-यांद्वारे अल्पसंख्याक शिक्षण संस्थांच्या कर्मचारी नियुक्तीमध्ये हस्तक्षेप केला जात आहे. गेल्या काही महिन्यांत अशी अनेक प्रकरणे निदर्शनास आल्यामुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने शिक्षणाधिका-यांवर नाराजी व्यक्त केली. तसेच, जागृती करण्यासाठी या निर्णयाची प्रत विदर्भातील सर्व शिक्षणाधिका-यांना पाठविण्यात यावी, असे निर्देश सरकारी वकील कार्यालयाला दिले.




अकोला जिल्ह्यातील पातूर येथील शाहबाबू उर्दू शिक्षण संस्थेला १७ जून २००५ रोजी अल्पसंख्याक दर्जा देण्यात आला आहे. संविधानातील आर्टिकल ३० (१) अनुसार सर्व धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांना त्यांच्या पसंतीच्या शैक्षणिक संस्था स्थापण्याचा आणि त्यांचे व्यवस्थापन करण्याचा अधिकार आहे. असे असताना शिक्षणाधिका-यांनी शाहबाबू उर्दू शिक्षण संस्थेमध्ये तीन कनिष्ठ लिपिकांच्या नियुक्तीला मान्यता देण्यास व शालार्थ आयडी जारी करण्यास नकार दिला होता.

यासंदर्भात ५ व १९ फेब्रुवारी २०२६ रोजी वादग्रस्त आदेश जारी करण्यात आले होते. परिणामी, संस्थेने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. त्यावर न्यायमूर्तिद्वय मुकुलिका जवळकर व नंदेश देशपांडे यांच्यापुढे सुनावणी झाली. दरम्यान, याचिकाकर्त्यांचे वकील अॅड. राम कारोडे यांनी वादग्रस्त आदेश अवैध असल्याचे विविध कायदेशीर तरतुदींच्या आधारे स्पष्ट केले. त्यामुळे न्यायालयाने वादग्रस्त आदेश अल्पसंख्याक संस्थेच्या अधिकाराची पायमल्ली करणारे असल्याचे जाहीर करून सरकारवर नाराजी व्यक्त केली. तसेच, संबंधित कनिष्ठ लिपिकांच्या नियुक्तीला मान्यता देऊन शालार्थ आयडी जारी करण्यात यावे, असे सांगितले.

# लोकरंग


१ साप्ताहिक संवाद

सोसलं अनुभवलं ते लिहील.

जळगाव येथील चित्रकार, निवृत्त कलाशिक्षक व लेखक राजू बाविस्कर यांना काळ्या निळ्या रेषा या आत्मकथनासाठी साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला. त्यानिमित्त त्यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद..१साहित्य अकादमी जाहीर झाल्यानंतर काय भावना आहेत?

मला पुरस्कार जाहीर झाल्याचे माध्यमांतून कळल्यावर आश्चर्याचा धक्काच बसला. पहिल्याच पुस्तकाची राष्ट्रीय पातळीवर दखल




घेतली जाणे स्वप्नवत आहे. खरोखर पुरस्कार मिळाला का, याची खात्री करून घेतली. मी मूळ चित्रकलेतला माणूस. चित्रे काढून विसरून जाणारा. लोकांनी चित्रे पाहावीत, समजून घ्यावीत, त्यांचा आनंद घ्यावा एवढीच अपेक्षा असते. असेच पुस्तकाबाबत आहे. साहित्य अकादमी मिळण्याचा आनंद शब्दांत मांडता येणार नाही.

२रेषा काळ्या निळ्या लिहिण्यामागे काय प्रेरणा होत्या?आजवर मी गावगाड्यातील, कष्टकरी माणसांची चित्रे काढत होतो.कोणाच्या कधी लक्षातही न राहणारी ही विनचेहऱ्याची माणसे चितारताना अनेक साहित्यिकांशी ओळखी झाल्या. नीळकंठ महाजन, शंभू पाटील यांच्याबरोबर राहता आले. चांगल्या माणसांची बेरीज करत राहिलो. उत्तम पुस्तके वाचत गेलो. विदर्भ साहित्य संघाचे नियतकालिक युगवाणीचे संपादक प्रफुल्ल शिलेदार यांनी माझी चित्रे पाहिली अन्? म्हणाले, तू जे चित्रांतून सांगतोस, ते तुझे आयुष्य लिहून काढ. मग युगवाणीत क्रमशः लिहीत गेलो. ते वाचून राजहंस प्रकाशनाच्या दिलीप माजगावकरांचा फोन आला. त्यांनी या लेखांचे पुस्तक करू असं सांगितलं अन्? काही दिवसांत आत्मकथन प्रसिद्ध झालं.

३तुमच्या आत्मकथनात कुठे कटुता दिसत नाही. एकूण मांडणी सकारात्मक आहे...

-खरे आहे. कारण सगळे गावकधीच वाईट नसते, हे मला माहीत आहे आणि मी ते अनुभवलेले आहे. चांगल्या माणसांबरोबर राहिल्यावर काही ना काही मिळतेच. माझ्यावर जेवू कित्येकांचे घालण्यापासून अनेक उपकार आहेत. त्यांचे ऋण अमान्य कसे करता येईल ? शाळेतल्या शिक्षकांनी चांगले चित्र काढतोस काढत राहा अशी पाठीवर कौतुकाची थाप दिली नसती तर मी चीत्रकार कुठे झालो असतो?म्हणूनच हि चांगली मानस माझ्यासाठी महत्वाची आहेत.

२दखल

क्लोव्ह डेंटल चायनाचां एकाच दिवसात ४८ नवीन दंत चिकित्सालयांचा विक्रमी शुभारंभ

भारतातील सर्वात मोठे दंत चिकित्सालय नेटवर्क असलेल्या क्लोव्ह डेंटलने आपल्या




कार्याची १५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त एकाच दिवसात ४८ नवीन चिकित्सालये सुरू केली आहेत . हा देशातील कोणत्याही दंत चिकित्सा नेटवर्कने केलेला एका दिवसातील सर्वात मोठा विस्तार आहे. या महत्त्वपूर्ण टप्प्यामुळे कंपनीचा विस्तार २६ शहरांमधील ७१५ चिकित्सालयांपर्यंत पोहोचला आहे, ज्यांना १,७०० हून अधिक दंतवैद्य, १,१०० दंत सहाय्यक आणि ५०० हून अधिक व्यावसायिकांचा पाठिंबा आहे.

हा विस्तार भारतातील संघटित दंतचिकित्सेच्या स्थिर वाढीचे प्रतीक आहे, जे क्षेत्र ऐतिहासिकदृष्ट्या विखुरलेल्या एकल-चिकित्सालय व्यवसायांचे वर्चस्व असलेले होते. गेल्या १५ वर्षांमध्ये, क्लोव्ह डेंटलने प्रतिबंधात्मक स्वच्छता आणि नियमित दंतक्षय व्यवस्थापनापासून ते अनेक इम्प्लांट्स आणि स्थिर डेन्चर्स यांचा समावेश असलेल्या जटिल संपूर्ण तोंडाच्या पुनर्वसनापर्यंत, दंत सेवेच्या संपूर्ण श्रेणीमध्ये ३५ लाखांहून अधिक रुग्णांवर उपचार केले आहेत. ऑर्थोडॉन्टिक्स, इनव्हिझलाइन, व्हिसल अलाइनर्स आणि ब्रेसेस यांसारख्या दंत विशेषज्ञांमध्ये एक अग्रणी म्हणून कंपनी उदयास आली आहे.सुरुवातीपासूनच, क्लोव्ह डेंटलने सर्व क्लिनिक्समध्ये सुसंगतता सुनिश्चित करण्यासाठी क्लिनिकल उपचार पद्धती तसेच उपचार कक्षांचे निर्जंतुकीकरण आणि स्वच्छतेच्या पद्धतींचे मानकीकरण करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. संपूर्ण नेटवर्कमध्ये दर पंधरवड्याला अचानक केल्या जाणाऱ्या ऑडिटद्वारे या मानकांना अधिक बळकटी दिली जाते.

३ चला पर्यटनाला

धार्मिक तीर्थक्षेत्रांचा जिल्हा जालना जालना जिल्हयात महत्वाची/प्रसिध्द पर्यटन केंद्रे विकसित होत आहेत त्यातील काही धार्मिक तीर्थक्षेत्रे, यात्रास्थळे आहेत. जालना शहराची मंमादेवी, आनंदस्वामी मठ, दुर्गामाता मंदीर प्रसिध्द असुन, अंबड येथे मस्त्याच्या आकारातील डोंगरावर मत्स्योदरी देवीचे हेमाडपंथी मंदिर असून, अंबड येथे जवळपास ४०० वर्षापूर्वीचा चौघाडा व कल्याणस्वामींचा म्दंग तसेच वेणूबाईचा तानपूरा संगीतप्रेमींनी केलेल्या संग्रहात आढळतो. मराठवाडयातील अष्टविनायकापैकी एक गणपती राजुर येथे आहे. जाम तालुका घनसांवगी येथे समर्थ रामदास स्वामींचे जन्मस्थान असून, त्यांचे मंदीर ही आहे. हेलस तालुका मंठा हे शिल्पकलेचे प्रणेते हेमाद्रीपंत यांचे गाव आहे. भोकरदन तालुक्यातील अन्वा या गावात पुरातन भव्या हेमाडपंथी शिवपंदिर असून, येथे कोरीव शिल्पही आहेत. शिवाय रऊनापराडा ता. अंबड येथे प्रसिध्द दर्गा असुन तेथे दरवर्षी मोठा ऊरुस भरतोअंबड येथील मत्स्योदरी देवीचे मंदिर हे जालना शहराच्या दक्षीणेस २१ कि.मी. अंतरावर स्थित आहे. देविचे मंदिर हे ज्या टेकडीवर स्थित आहे त्या टेकडीचा आकार मासोळी (मत्स्य) सारखा आहे. त्यामुळे या देवीस मत्स्योदरी देविचे मंदिर म्हणून ओळखले जाउ लागले. हे मंदिर जवळपासच्या क्षेत्रातील अत्यंत जुन्या मंदिरांपैकी एक आहे.ऑक्टोबर महिन्यामध्ये नवरात्र महोत्सवाच्या निमीत्ताने दरवर्षी या मंदिरामध्ये मोठी यात्रा भरते



संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल -
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
शनिवार २१ मार्च २०२६


या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## पत्रकार सुनील जाधव यांच्या नातीचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा

पनवेल प्रतिनिधी-सुनील जाधव

नवी मुंबई,नवीन पनवेल येथील आकुर्ली या ठिकाणी अपेक्षा संकुल मधे पत्रकार सुनील जाधव यांची नात शुभश्री विनोद कोतवाल हिचा वाढदिवस दि,१९/०३/२०२६ रोजी अत्यंत उत्साहात आणी आंनदी वातावरणात साजरा करण्यांत आला.या प्रसंगी आप्तेष्ट ,सामाजिक कार्यकर्ते,आणि मित्रपरिवाराने उपस्थित राहुन लाडक्या शुभश्रीला उत्तम आरोग्य आणि ऊज्वल भविष्यासाठी भरभरुन शुभेच्छा दिल्या. हा वाढदिवस कार्यक्रम दिवेकर यांच्या अपेक्षा संकुल येथील निवास्थानी आयोजित केला होता.या कार्यक्रमाला बाल कलाकारांनी मोठ्या प्रमाणात हजेरी लावुन संगित,न्रुत्य आणि मनसोक्त गाणी गाउन कार्यक्रमाला रंग भरण्याचे काम केले.तर अन्नदानाचा ही कार्यक्रम ठेवण्यांत आला होता.या कार्यक्रमाला समाजसेविका सुनीता जाधव,अतोणे येथील सामाजिक कार्यकर्त्या विठाबाई सोनावणे,सुमिता जाधव,साधना गायकवाड,भारती गायकवाड,सुमिता कोतवाल,हर्षाली गोरेगांवकर,मिरा गायकवाड,श्वेता रोकडे,उज्वला कदम,सुचीता जाधव,विनोद कोतवाल,हरेष रहाटाडकर,विनायक कोतवाल, अजित गायकवाड,संतोंष गायकवाड, धम्मेश जाधव(सामाजिक कार्यकर्ते,पनवेल विभाग),राजेश गायकवाड(राष्ट्रवादी काँग्रेस,गट), गणेश जाधव,(युवक गट),विशाल गायकवाड(पाली,आठवले गट)ई.मान्यवर मंडळी उपस्थित होती.




## अष्टविनायक श्री बल्लाळेश्वर देवस्थानचे अन्नछत्र बंद इराण इस्त्रायल युद्धाचे पडसाद भाविकांच्या अन्नाचा प्रश्न ऐरणीवर प्रसादाचा लाडू सुद्धा बंद

रायगड जि. उ.उपसंपादक / मंगेश यादव : जागतिक स्तरावर इराण आणि इस्त्रायल दरम्यान सुरू असलेल्या युद्धाचे पडसाद आता थेट अष्टविनायक तीर्थक्षेत्रांत उमटू लागले आहेत. या युद्धाच्या पार्श्वभूमीवर कमर्शियल गॅस सिलेंडरचा पुरवठा बंद झाल्याने, प्रसिद्ध अष्टविनायक गणपती मंदिर श्री बल्लाळेश्वर देवस्थानचे अन्नछत्र सद्यस्थितीत बंद झाले आहे. यामुळे मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या शेकडो भाविकांच्या अन्नाचा मोठा प्रश्न निर्माण झाला असून, लोकप्रिय असलेला प्रसादाचा लाडूदेखील मिळणे बंद झाले आहे.ङ्ग श्री बल्लाळेश्वराच्या दर्शनासाठी देशभरातून दररोज शेकडो भाविक पालीत येतात. साधारणतः दिवसा आणि रात्री मिळून ४०० भाविक देवस्थानच्या अन्नछत्रात अत्यल्प दरात महाप्रसादाचा लाभ घेतात. एप्रिल आणि मे महिन्याच्या सुट्ट्यांमध्ये ही दिवसाला संख्या ८०० च्या वर जाते. मात्र, गॅसअभावी अन्नछत्र बंद झाल्याने भाविकांची प्रचंड गैरसोय होत आहे. कमर्शियल गॅसचा पुरवठा नसल्याने आजूबाजूच्या हॉटेलमधील व्यवस्थाही कोलमडली आहे. जिथे व्यवस्था उपलब्ध आहे, तिथे भाविकांना अन्नछत्राच्या तुलनेत कित्येक पटीने जास्त पैसे मोजावे लागत आहेत. केवळ भूक भागवणे हा उद्देश नसून, देवस्थानचा सात्विक प्रसाद ग्रहण केल्याने मिळणाऱ्या मानसिक व आध्यात्मिक समाधानालाही भाविक मुकले आहेत.






## शाश्वत भातशेतीसाठी यांत्रिकीकरण आवश्यक -डॉ. पी. यू .शहारे

कर्जत : मजुरांची कमतरता आणि मजुरीचे वाढते दर लक्षात घेता शाश्वत भातशेतीसाठी यांत्रिकीकरणाची कास धरणे आवश्यक आहे,असे प्रतिपादन डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ. पी. यू. शहारे यांनी केले.आदिवासी उप योजना, अखिल भारतीय समन्वित बियाणे ( पिके ) योजनेंतर्गत येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सह्याद्री अतिथी गृह सभागृहात आयोजित भात पीक बीजोत्पादन प्रशिक्षण कार्यक्रमात अध्यक्षीय मार्गदर्शन करताना ते बोलत होते.व्यासपीठावर सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे, कृषी विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ.रवींद्र मर्दाने, तालुका कृषी अधिकारी आर. ए. शिंदे उपस्थित होते.ङ्ग डॉ. शहारे यांनी भात लावणीपासून कापणीपर्यंत लागणाऱ्या विविध यंत्रांची माहिती देत अल्प खर्चाची,कमी कष्टाची व फायदेशीर शेतीसाठी यांत्रिकीकरणाचे विविध पैलू समजावून सांगितले.ते म्हणाले की, एक एकर भात लावण्यासाठी सव्वा लाख वेळा वाकावे लागते.एक हेक्टर भात शेती क्षेत्रासाठी बैलाच्या सहाय्याने लाकडी नांगर वापरताना ६४ किलोमीटर चालावे लागते तेव्हा भात शेती होते.हे कष्टप्रद असल्याने भात शेतीत यांत्रिकीकरण काळाची गरज आहे.ङ्ग डॉ. वाघमोडे यांनी जमिनीच्या प्रकारानुसार भात जाती कशा निवडाव्यात , पोषणमूल्ये असलेल्या तसेच भाकरी, पोहे, मुरमुरे, जेवणाचा आस्वाद वाढविणाऱ्या वेगवेगळी गुणवैशिष्टये असलेल्या भात जातींचा कसा वापर करावा,हे पटवून दिले.शेतकऱ्यांनी वेळोवेळी संशोधन केंद्राला भेट देऊन नवतंत्रज्ञान जाणून घेतल्यास त्यांच्या उत्पन्नात निश्चित वाढ होईल,असे नमूद केले.ङ्ग शिंदे यांनी शासनाच्या विविध कृषीविषयक योजनांचा उहापोह करीत शेतकरी गट नोंदणी करण्याबाबतची पद्धती,त्याचे फायदे सांगून लाभ घेण्याचे आवाहन केले.ङ्ग यावेळी आदिवासी उप योजनेंतर्गत शिलारवाडी, खरबाची वाडी, खोंडेवाडी व नागेवाडीच्या पाच गटाला मनुष्यचलित भात लावणी यंत्र, नॅपसॅक स्प्रे पंप, तसेच ५० शेतकऱ्यांना युरिया ब्रिकेट्स, वैभव विळे, पॉकेट डायरी, घडीपत्रिकांचे वितरण डॉ. शहारे यांच्या हस्ते करण्यात आले.ङ्ग कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी केले.ङ्ग तांत्रिक सत्रात क. भात पैदासकार डॉ. महेंद्र गवई यांनी भात बीजोत्पादन लागवड तंत्रज्ञान , वनस्पती शरीरक्रिया शास्त्रज्ञ डॉ.मीनाक्षी केळुस्कर यांनी भात बीजोत्पादन नोंदणी , मृदा शास्त्रज्ञ डॉ.देवदत्त जोंधळे यांनी भात पिकासाठी खत व्यवस्थापन आणि सेंद्रिय खत निर्मिती तंत्रज्ञान , कीटकशास्त्रज्ञ डॉ.वैशाली सावंत यांनी भात बीजोत्पादन प्रक्षेत्रावरील कीड व रोग व्यवस्थापन , स.उद्यानविद्यावेत्ता डॉ.राजेंद्र सावळे यांनी रोपवाटिका आणि भाजीपाला व्यवस्थापन यावर मार्गदर्शन केले.यावेळी शास्त्रज्ञांनी विविध शेतकऱ्यांच्या शंकांचे निरसनही केले.




## पराभवानंतरही वचनपूर्तीचा आदर्श! बुधाराम सरनोबत यांच्या प्रयत्नांतून मातृछाया चाळीत उजेडाची किरणे

टिटवाळा,(प्रतिनिधी): निवडणुकीतील पराभवानंतरही दिलेला शब्द पूर्ण करत माजी उपमहापौर बुधाराम सरनोबत यांनी इंदिरानगरमधील मातृछाया चाळ येथे रोडलाईट प्रकल्प यशस्वीपणे पूर्ण करून राजकीय प्रामाणिकतेचा आदर्श घालून दिला आहे. सुमारे तीन लाख रुपयांचा महापालिका निधी विद्युत विभागाला उपलब्ध करून देत या पथदिव्यांची उभारणी करण्यात आली, ज्यामुळे परिसरात उजेड पसरला आहे.ङ्गगेल्या सहा महिन्यांपासून या कामासाठी सातत्याने पाठपुरावा करत असलेल्या सरनोबत यांनी निवडणूक प्रचारावेळी नागरिकांना दिलेले आश्वासन विसरले नाही. अपेक्षित निवडणूक निकाल न लागूनही त्यांनी प्रशासनाकडे पाठपुरावा सुरू ठेवला आणि अखेर रखडलेला प्रकल्प मार्गी लावला.ङ्गयापूर्वी या परिसरात अंधारामुळे नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः महिलांमध्ये आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना होती. मात्र नव्याने बसवलेल्या रोडलाईटमुळे परिसर अधिक सुरक्षित आणि सुसज्ज झाला असून, नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.ङ्गउद्घाटन प्रसंगी स्थानिक नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत सरनोबत यांचे आभार मानले. "पराभवानंतरही वचन पूर्ण करणारा नेता दुर्मिळ असतो," अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. या कृतीमुळे राजकारणात विश्वासार्हतेचा एक सकारात्मक संदेश गेल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.ङ्गदरम्यान, या उपक्रमामुळे परिसरातील मूलभूत सुविधांमध्ये सुधारणा होण्याची नांदी मिळाली असून, नागरिकांनी भविष्यातही अशाच विकासकामांची अपेक्षा व्यक्त केली आहे.



## पशुपालकांसाठी सुवर्णसंधी मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजनेचा लाभ घेण्याचे पशुसंवर्धन विभागाचे आवाहन


रायगड जिल्हा उत्तर उपसंपादक / मंगेश यादव : ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देण्यासाठी आणि शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी राज्य शासनाने मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना उपयुक्त ठरणार आहे. या योजने अंतर्गत दुग्ध व्यवसाय, शेळी-मेंढी पालन आणि कुक्कुटपालन यांसारख्या पूरक व्यवसायांना प्रोत्साहन देण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन विभागातर्फे करण्यात आले आहे.

या योजनेचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे केवळ पशुधन वाटप न करता, शेड उभारणी, विमा आणि आधुनिक साधनसामग्रीसाठीही मोठे अनुदान दिले जाणार आहे.

सदरच्या योजना राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय अशा दोन स्वरूपात राबवण्यात येणार आहेत. ङ्गराज्यस्तरीय योजनेत ५ दुधाळ गाई किंवा म्हशींच्या गटासाठी ११.३५ लाख रुपयांचा प्रकल्प असून, शेळी-मेंढी पालन ५० माद्या आणि ५ नर अशा गटासाठी ११.३८ लाख रुपयांचा प्रकल्प मंजूर करण्यात आला आहे. कुक्कुटपालन अंडी देणाऱ्या ५००० पक्षांच्या पालनासाठी ३० लाख रुपयांपर्यंतचा प्रकल्प असून, यात शेड बांधकामासह ऑटोमेशन प्रणालीचाही समावेश आहे. सर्व योजनांमधील सर्वसाधारण लाभार्थ्यांना ५०% आणि अनुसूचित जाती/ जमातीतील लाभार्थ्यांना ७५% अनुदान मिळेल.ङ्गजिल्हास्तरीय योजनाङ्ग१) दुधाळ गट वाटप योजना एक दुधाळ गाय म्हैस व तीन वर्षाचा विमा किंवा दोन दुधाळ गाय म्हैस व तीन वर्षाचा विमाङ्ग२) शेळी मेंढी गट वाटप पाच अधिक एक शेळी मेंढी गट प्लस विमा दहा अधिक एक शेळी मेंढी गट अधिक विमाङ्ग३) अंडी देणाऱ्या सुधारित कुकुट देशी पक्षांचे वाटप १६ ते १८ १६ ते १८ आठवडे अंडी देणाऱ्या ५०० पक्षांचे वाटपङ्ग४) वैरण विकास योजनाङ्गअ) १०० %अनुदानावर चारा बियाणे वाटप योजनाङ्गब) हायड्रोपोनिक तंत्रद्वारे चारा उत्पादन योजनाङ्गक) मिनी टी एम आर उपकरण खरेदीसाठी अनुदान ङ्गड) पशुपालकांना कडबा कुट्टी यंत्र खरेदीसाठी अनुदानङ्गइ) सुधारित देशी / पारडांची जोपासना अंतर्गत कालवड / पारडू यांना पशुखाद्य पुरवठा योजना ङ्ग५) नर पारडू (रेडकू) संगोपन व संवर्धन प्रोत्साहन योजनाङ्ग६) पशुपालकांना बैल जोडी खरेदी योजना







भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफिसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफिससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )